आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१५  ऑक्टोबर २०२६ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- यंदाच्या दिवाळीतली एसटीची हंगामी भाडेवाढ रद्द
- प्रत्यक्ष-कर महसुलात १३ पूर्णांक २१ शतांश टक्के वाढ
- एसआयआर विरोधात मोर्चा काढल्याप्रकरणी विरोधी पक्षाच्या नेत्यांना सर्वोच्च न्यायालयाची नोटीस
- धर्मांतर केलेल्या मागासवर्गियांना आरक्षणाच्या लाभांवर आपोआप दावा करता येणार नाही, असा सर्वोच्च न्यायालयाचा निवाडा

**आणि**

- २३ वर्षांखालच्या कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेच्या ग्रेको रोमन प्रकारात विश्वजीत मोरेची विक्रमी रौप्यपदकाला गवसणी

<><><><><>

राज्यातली दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, यंदाच्या दिवाळीत एसटीची हंगामी भाडेवाढ केली जाणार नाही, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज सांगितलं. सणासुदीच्या हंगामात दर वर्षी प्रमाणे यंदा १ ते १५ नोव्हेंबर दरम्यान प्रवासी भाड्यात सरसकट १५ टक्के वाढ करण्याचा प्रस्ताव एसटी प्रशासनानं सादर केला होता. मात्र, आर्थिक संकटाचा सामना करणाऱ्या जनतेवर अतिरिक्त भार टाकणं योग्य नसल्याची भूमिका घेत, परिवहन मंत्र्यांनी हा प्रस्ताव फेटाळला.

एसटी महामंडळाच्या आर्थिक अडचणींवर मात करण्यासाठी प्रवाशांवर थेट भार टाकण्याऐवजी पर्यायी उपाययोजना करण्याची सूचना त्यांनी यावेळी केली.

<><><><><>

सणासुदीच्या काळात साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी आणि साखरेचा पुरवठा सुरळीत राहावा, यासाठी सरकारने साठाविषयक नियमांमध्ये सुधारणा केली आहे.

आता साखर व्यापाऱ्यांना केवळ १५ दिवसांपर्यंतच साखर साठवून ठेवता येईल. हे नियम आजपासून येत्या ३० नोव्हेंबरपर्यंत लागू राहतील, असं ग्राहक व्यवहार मंत्रालयाने म्हटलं आहे. सुधारित नियमांनुसार, कोलकाता आणि त्याच्या विस्तारित महानगर क्षेत्रासाठी तसंच, आसाममधे साठ्याची मर्यादा २ हजार क्विंटल इतकी निश्चित करण्यात आली आहे.

<><><><><>

चालू आर्थिक वर्षात आतापर्यंतच्या आकडेवारीनुसार प्रत्यक्ष-कर महसुलात १३ पूर्णांक २१ शतांश टक्के वाढ होऊन करसंग्रह १३ लाख ३८ हजार कोटी रुपये झाला आहे. एक एप्रिल ते १४ ऑक्टोबर या कालावधीत कंपन्यांनी प्रत्यक्ष करापोटी ५ लाख ९९ हजार कोटी रुपयांचा भरणा केला. तो २० पूर्णांक ५८ शतांश टक्क्यांपेक्षा जास्त आहे. व्यक्तिगत करदाते आणि हिंदू संयुक्त कुटुंबांद्वारे करभरणाही ५ पूर्णांक ८३ शतांश टक्क्यांनी वाढून ६ लाख ९२ हजार कोटी रुपये झाला.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून कामाला सुरुवात केली त्याला २५ वर्षं झाली. या काळात ते आधी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून आणि नंतर भारताचे प्रधानमंत्री म्हणून सलग कार्यरत आहेत. जनसेवा ते देशसेवा असा हा प्रवास सेवा आणि सुशासनाच्या मार्गावरुन विकसित भारत २०४७च्या दिशेने होत आहे. सर्वसमावेशक विकास, सामाजिक सक्षमीकरण, आणि समर्पण भावाचा हा प्रवास सर्वसामान्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणत आहे. यानिमित्तच्या विशेष मालिकेत आज आपण जाणून घेणार आहोत वक्फ मालमत्तांच्या व्यवस्थापनासाठी वक्फविषयक कायद्यात केलेल्या सुधारणां विषयी

**होल्ड- व्हीसी ( सेकंद)**

*(इस्लामिक कायद्याअंतर्गत धार्मिक किंवा धर्मादाय हेतूसाठी देणगी म्हणून दिलेल्या मालमत्तेला वक्फ असं म्हणतात. या जमिनीची मालकी अल्लाहकडे हस्तांतरित केली जाते. त्यानंतर कोणालाही त्यावर मालकी प्रस्थापित करता येत नाही. त्याचं व्यवस्थापन वक्फ बोर्डाकडे असतं. भारतात सुमारे ९ लाख ४० हजार एकर एवढ्या जमिनी अशाप्रकारे वक्फ मालमत्ता आहेत. महाराष्ट्रात दोन लाख एकराहून जास्त क्षेत्रावर ३६ हजार ७०१ वक्फ मालमत्ता आहेत. जगातल्या सर्वाधिक वक्फ मालमत्ता भारतात असून देशात सेनादलं आणि रेल्वे*

*यांच्यानंतर सर्वात जास्त मालमत्ता वक्फ बोर्डाच्या अधिपत्याखाली आहेत.  देशात अनेक ठिकाणी वक्फ मालमत्तांच्या व्यवस्थापनाबाबत त्रुटी, गैरप्रकार किंवा घोटाळे झाल्याच्याही तक्रारी आहेत. या पार्श्वभूमीवर या मालमत्तांच्या व्यवस्थापनान सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी वक्फ  सुधारणा विधेयक ८ ऑगस्ट २०२४ रोजी मांडण्यात आलं. ३ एप्रिल २०२५ रोजी लोकसभेने आणि ४ एप्रिल २०२५ रोजी राज्यसभेने ते संमत केलं.   ५ एप्रिल २०२५ रोजी राष्ट्रपतींनी स्वाक्षरी केल्यावर वक्फ सुधारणा कायदा अस्तित्वात आला. देशोदेशी विशेषतःमुस्लिम बहुल देशांमधे वक्फबाबत वापरल्या जाणाऱ्या नियमांचाही आधार घेऊन या सुधारणा करण्यात आल्या. सर्वोच्च न्यायालयात या कायद्याला  आव्हान देण्यात आलं, मात्र सरसरकट स्थगिती द्यायला न्यायालयाने नकार दिला. काही तरतुदी वगळता हा कायदा देशभरात लागू झाला आहे.)*

<><><><><>

मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेतल्या कथित अनियमिततेच्या विरोधात विरोधी पक्षांनी सर्वोच्च न्यायालयावर काढलेल्या मोर्चाला आव्हान देणाऱ्या याचिकेवर सर्वोच्च न्यायालयानं आज काँग्रेस नेते राहुल गांधी, समाजवादी पक्षाचे अध्यक्ष अखिलेश यादव यांच्यासह इतरांना नोटिसा बजावल्या. सर्वोच्च न्यायालयाला धाक दाखवून कुणीही कोणतीही गोष्ट करवून घेऊ शकत नाही, असं न्यायालयानं स्पष्ट केलं. एसआयआर प्रक्रियेतल्या अनियमितता आणि मोठ्या प्रमाणावर मतदारांची नावं यादीतून वगळल्यासंदर्भात राहुल गांधी आणि इतर नेत्यांनी दाखल केलेल्या वेगळ्या याचिकेवर, न्यायालयानं निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांच्याकडून उत्तरं मागवली आहेत. याच मुद्द्यावरच्या इतर याचिकांना ही याचिका जोडून घेऊ, असं सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची यांच्या पीठानं सांगितलं. निवडणूक आयोगासंदर्भातल्या याचिकांवर न्यायालयानं केंद्र सरकार आणि इतरांनाही नोटिसा बजावल्या. जंतरमंतरचं नाव अधिकृत आंदोलनस्थळांच्या यादीतून काढून टाकायच्या निर्णयाला आव्हान देणारी याचिकाही न्यायालयानं स्वीकारली.

<><><><><>

हिंदू धर्मातून इतर कोणत्याही धर्मात, धर्मांतर करणाऱ्या व्यक्तींना मागासवर्गीय प्रवर्गा अंतर्गत  आरक्षणाच्या लाभांवर  आपोआप दावा करता येणार नाही, असं सर्वोच्च न्यायालयानं म्हटलं आहे. मद्रास उच्च न्यायालयाच्या निर्णयाविरोधात तामिळनाडू सरकारने दाखल केलेली याचिका फेटाळून लावताना,

न्यायमूर्ती प्रशांत कुमार मिश्रा आणि न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर यांच्या पिठानं हा निर्णय दिला.

धर्मांतरापूर्वीच्या जातीमध्ये अनुभवलेला सामाजिक मागासलेपणा धर्मांतरानंतरही कायम राहत नाही, तसंच बिगर-हिंदू सामाजिक व्यवस्थेत धर्मांतर केल्यामुळे आपोआप कोणत्याही अधिसूचित मागासवर्गीय समुदायाचं सदस्यत्व प्राप्त होत नाही, असं न्यायालयानं यावेळी स्पष्ट केलं. हिंदू, शीख किंवा बौद्ध धर्माव्यतिरिक्त इतर कोणताही धर्म पाळणारी व्यक्ती अनुसूचित जातीचा दर्जा गमावते, असं न्यायालयानं सांगितलं.

<><><><><>

परदेशी नागरिक विषयक कायद्यातल्या तरतुदींचं उल्लंघन केल्याप्रकरणी मुंबई पोलिसांनी अभिनेता इम्रान खान याला २८ ऑक्टोबरपर्यंत भारत सोडण्याची नोटीस बजावली आहे.

इम्रान खान हा अमेरिकेचा नागरिक आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यासाठी मुंबईत १० ऑक्टोबरला आंदोलन झालं होतं. त्या आंदोलनात इम्रान खानने भाग घेतल्याबद्दल पोलिसांनी त्याला ताब्यातही घेतलं होतं.

<><><><><>

लास वेगास इथं सुरू असलेल्या २३ वर्षांखालच्या कुस्ती जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत भारताचा विश्वजीत मोरे यानं ग्रीको रोमन प्रकारात विक्रमी रौप्यपदकाला गवसणी घातली आहे. पुरुषांच्या ५५ किलो वजनी गटात केवळ एका गुणाच्या फरकाने त्याचं सुवर्णपदक हुकलं. ग्रीको रोमन प्रकारातलं भारताचं हे पहिलंच रौप्यपदक आहे. यापूर्वी विश्वजीतनं या स्पर्धेत २ वेळा कांस्यपदक पटकावलं होतं.

<><><><><>

इन्स्पायर मानकतर्फे आयोजित राष्ट्रीय आंतरशालेय विज्ञान आणि तंत्रज्ञान स्पर्धेत महाराष्ट्रातल्या ७ विद्यार्थ्यांना सुपर सिक्स्टीमधे स्थान मिळालं आहे. अहिल्यानगरची श्रद्धा लोंढे हिने सादर केलेल्या दृष्टीहीनांकरता ए-आय-आधारित शिक्षकसहायक या प्रकल्पाला सुवर्णपदक मिळालं आहे. विज्ञानविषयक संशोधन आणि नवोन्मेषाला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकारच्या विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयातर्फे इन्स्पायर- मानक हा उपक्रम राबवण्यात येतो.

<><><><><>

पूर्व विदर्भाची जीवनवाहिनी ठरणारं गोसेखुर्द धरण शंभर टक्के भरलं आहे. मध्य प्रदेशातल्या पावसामुळे वैनगंगा नदीचा प्रवाह सुरू राहिल्यानं धरणातल्या पाणीसाठ्यात वाढ झाली. त्यामुळे भंडारा, नागपूर, चंद्रपूर आणि गडचिरोली या चार जिल्ह्यांमधे पिण्याचं पाणी, शेती आणि जनावरांच्या पाण्याचा प्रश्न काही प्रमाणात सुटण्याची आशा निर्माण झाली आहे.

<><><><><>

धान्य खरेदी, साठवणी, आणि विक्री प्रक्रियेत त्रुटी आढळल्यामुळे भंडारा जिल्ह्यातल्या १८६ शासकीय धान खरेदी केंद्रांना जिल्हाधिकाऱ्यांनी कारणे दाखवा नोटीस बजावली आहे. या प्रकरणी आज होणाऱ्या सुनावणीत केंद्र चालक आपली बाजू मांडतील. समाधानकारक खुलासा देण्यात अपयशी ठरलेल्या केंद्र चालकांविरोधात कारवाई केली जाईल, असं जिल्हाधिकारी कार्यालयानं म्हटलं आहे.

<><><><><>

यंदाच्या सप्टेंबर महिन्यात देशात प्रवासी वाहनांची घाऊक विक्री, वार्षिक आधारावर २१ पूर्णांक ८ दशांश टक्क्यांनी वाढून ४ लाख ५४ हजार ५७४ युनिट्सवर पोहोचल्याचं ‘सियाम’ या उद्योग संघटनेनं जारी केलेल्या अहवालात

म्हटलं आहे. गेल्या वर्षी याच कालावधीत ती ३ लाख ७३ हजार ३४७ युनिट्स इतकी होती.

यंदाच्या सप्टेंबर महिन्यात दुचाकी वाहनांची  घाऊक विक्री साडेतेरा टक्क्यांनी वाढून २४ लाख ६३ हजार युनिट्सवर पोहोचली असून, गेल्या वर्षी याच काळात ती २१ लाख ७० हजार युनिट्स इतकी होती.

//<><><><><>//